मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहिराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# तरुणांना शासकीय नोकरीपासून वंचित ठेवण्याचा महाविकास आघाडीचा कट!

## पिंपरी-चिंचवडभाजपा शहराध्यक्ष शंकर जगताप यांची टीका

**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्सप्रेस मराठी।** पिंपरी येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात आज सकाळी झालेल्या आंदोलनात तत्कालीन माहविकास आघाडी (काँग्रेस, राष्ट्रवादी शरद पवार गट आणि उबाठा) सरकारच्या काळातील कंत्राटी भरतीच्या निर्णयाचा भाजपाकडून जाहीर निषेध करण्यात आला. तत्कालीन महाविकस आघाडी (काँग्रेस, राष्ट्रवादी शरद पवार गट आणि उबाठा) सरकारने कंत्राटी भरतीचा निर्णय घेवून युवकांना बेरोजगार करण्याचा घाट घातला होता. तरुणांना शासकीय नोकरीपासून वंचित ठेवून तरुणांची स्वप्ने भंग केली, अशी टीका पिंपरी चिंचवड शहर (जिल्हा) भाजपा शहराध्यक्ष शंकर जगताप यांनी केली.

शंकर जगताप पुढे म्हणाले की, कंत्राटी भरतीचा निर्णय तत्कालीन महाविकास आघाडी (काँग्रेस, राष्ट्रवादी शरद पवार गट आणि उबाठा) सरकारने घेतलेला होता. हा निर्णय घेऊन उबाठा सरकारने राज्यातील लाखो बेरोजगार तरुणांची दिशाभूल करण्याचे महापाप केले. स्वतःचे सरकार असताना स्वतःच निर्णय घ्यायचा आणि सरकार गेल्यानंतर स्वतःच आरोप करायचे, अशी दुहेरी भुमिका महविकास आघाडी घेत असून महायुती सरकारला बदनाम करण्याचा डाव आखत आहे. मात्र, रोल मॉडेल असलेल्या शिंदे, फडणवीस, पवार यांनी महाविकास आघाडीचा हा डाव उधळून लावला. महायुतीच्या सरकारने कंत्राटी भरतीचा हा निर्णय रद्द



करून तरुणांच्या शासकीय नोकरीच्या आशा पुन्हा पल्लवित केल्या आहेत. २००३ पासून सुशील कुमार शिंदे मुख्यमंत्री असल्या पासून राज्यात कंत्राटी भरती सुरु असून तिच कंत्राटी पद्धत उध्दव ठाकरे मुख्यमंत्री असताना देखील सुरूच होती. आज महविकास आघाडीचे जे नेते या पद्धती विरुद्ध गदारोळ माजवत आहेत. त्याच महाविकास आघाडीच्या काळात या कंत्राटी कामगार भरतीला निविदा प्रक्रिया करून मान्यता देण्यात आली होती. त्यांच्याच या निर्णयाची अंमलबजावणी होण्या आधीच महाविकास आघाडीचे सरकार कोसळले आणि महायुतीचे सरकार स्थापन झाले. महायुतीच्या या सरकारला शासकीय कार्यपद्धतीचा एक भाग म्हणून महाविकास आघाडी सरकारने घेतलेल्या या निर्णयाची केवळ अंमलबजावणी करावी लागली. आता याच अंमलबजावणीच्या निर्णया विरुद्ध हे महाविकास आघाडीचे नेते बोंब मारत असून महायुतीच्या सरकारला नाहक बदनाम करत सुटले आहेत. महाराष्ट्रात कंत्राटी भरतीसाठी जे दोषी आहेत, तेच गदारोळ करीत आहेत ही सत्य माहिती आम्ही जनतेसमोर या आंदोलनाच्या माध्यमातून आणत आहोत. महाविकास आघाडीच्या या फसव्या धोरणाचा आणि जनतेच्या डोळ्यात धूळफेक करण्याच्या वृत्तीचा या आंदोलनाच्या माध्यमातून आम्ही जाहीर निषेध करीत आहोत असे मत भाजप जिल्हा अध्यक्ष शंकर जगताप यांनी व्यक्त केले. भाजपा चिंचवड विधानसभा आमदार अश्विनीताई जगताप, माजी जिल्हा अध्यक्ष सदाशिव खाडे, जिल्हा सरचिटणीस नामदेव ढाके, शितल शिंदे यांनी देखील आपल्या मनोगत मांडताना उबाठा सरकारचा निषेध आणि महायुती सरकारचे अभिनंदन केले.

# 'डीजे' व 'लेजर लाईट' विरहित उत्सव साजरे करा!

## कारवाई करायला भाग पाडू नका : उपमुख्यमंत्री अजित पवार

**पिंपरी-चिंचवड न्यूज एक्सप्रेस मराठी।** गणेशोत्सवात डीजेचा आवाज आणि लेजर लाईटमुळे अनेकांना त्रास झाला. काहींना बहिरेपणा आले, तर काहींना हार्टअटॅक आला. लेझर लाईटमुळे अनेकांच्या डोळ्यांना इजा होते. डीजेमुळे कानाला इजा होते. लोकांना त्रास होतो. पण कोण कोणाचं ऐकणार? लेजर लाईट आणि डीजे विना गणेशोत्सव, इतर उत्सव साजरे करण्याचा संकल्प करावा. अन्यथा कडक कारवाई करायला भाग पाडू नका, असा इशारा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिला. पिंपरी-चिंचवड शहर राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने घेण्यात आलेल्या सार्वजनिक गणेशोत्सव आणि गौरी गणपती सजावट स्पर्धे चे बक्षीस वितरण पवार




यांच्या हस्ते आज (दि.२०) आकुर्डीतील ग. दि. माडगूळकर नाट्यगृहात संपन्न झाले, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष अजित गव्हाणे, आमदार अण्णा बनसोडे, माजी विलास लांडे, माजी महापौर संजोग वाघेरे पाटील, महिला अध्यक्ष कविता आल्हाट, मंगला कदम, माजी विरोधी पक्षनेते नाना काटे, राजू मिसाळ, श्याम लांडे, आदी उपस्थित होते.

या स्पर्धेमुळे पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्यास चालना मिळणार आहे. सध्या राज्यात सगळीकडेच प्रदूषण वाढले आहे. त्याला आपण सर्वजण जबाबदार आहोत. जबाबदारीचे भान दुर्दैवाने सर्वांच्या लक्षात येत नाही. त्यामुळे वेगवेगळे आजार येत आहेत. रुग्णांची संख्या वाढत आहे. त्यामुळे काळजी घेतली पाहिजे. सर्वांनी पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करावा असे ते म्हणाले.

# लोकप्रिय आमदार सुनील आण्णांच्या कार्यकर्त्यांनी महिलांचा आनंद केला द्विगुणित

## आमदारांच्या वाढदिवसानिमित्त नवरात्र उत्सवात मावळवासिय महिलांच्या सन्मानार्थ आयोजित केलेल्या लकी ड्रॉ स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद

**मावळ।**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**
मावळचे आमदार सुनिल शेळके यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून मावळ तालुक्यात महिलांसाठी लकी ड्रॉ स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. नवरात्र उत्सवात देवीचा जागर होत असताना खास महिलांसाठी आयोजित केलेल्या लकी ड्रॉ स्पर्धेमुळे आमदार शेळके यांच्या कार्यकर्त्यांनी महिला-भगिनींचा आनंद द्विगुणित केला. विजेत्या स्पर्धकांना मानाची पैठणी, सोन्याची नथ, सुवर्णदीप, अष्टलक्ष्मी मातेची चांदीची फ्रेम अशा वस्तू देण्यात आल्या. यावेळी महिलावर्गासह सर्वचजण आनंदोत्सवात सहभागी झाले होते.

यावेळी लहान मुलांनी आमदारांचा फेस मास्क लावला होता. आमदार सुनिल शेळके यांचा वाढदिवस केक कापून उत्साहात साजरा करण्यात आला. आमदार सुनिल शेळके यांच्या वाढदिवसाची दरवर्षी चर्चा होत असते. कार्यकर्त्यांसाठी तर एक पर्वणीच ठरलेली असते. अनेक सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक उपक्रम राबवित तालुक्यात वाढदिवस साजरा होत असतो. यावर्षी आमदार शेळके यांनी वाढदिवसाच्या दिवशी भेटू शकणार नाही, असे आवाहन केले होते. मात्र मावळ तालुक्यातील ग्रामीण व शहरी भागात कार्यकर्त्यांनी नियोजन करीत स्थानिक ग्रामस्थ, महिला-भगिनी, युवावर्ग यांना एकत्र घेऊन विविध उपक्रम राबविले. आणि फटाक्यांची आतषबाजी करीत आमदारांवर शुभेच्छांचा वर्षाव केला.



### तीनशे फूट उंचीवरुन आमदार शेळके यांना शुभेच्छा

» गिर्यारोहकांच्या साहसाला आव्हान देणारा महाराष्ट्रातील सर्वात अवघड असलेला तीनशे फूट उंचीच्या वजीर सुळक्यावरून मावळचे आमदार सुनिल शेळके यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देण्यात आल्या. बुद्धिबळाच्या पटावर जसा वजीर असतो तसा हा सुळका दिमाखात उभा आहे. हा उंच सुळका सर करण्याचे प्रत्येक गिर्यारोहकाचे स्वप्न असते. पॉईंट ब्रेक ॲडवेंचर ग्रुपच्या मार्गदर्शनाखाली नऊ वर्ष वयाच्या कु.साई नारायण मालपोटे, आठ वर्ष वयाची कु.ध्रुवी गणेश पडवळ आणि विशाल गोपाळे यांनी वजीर सुळका सर करुन अनोख्या पद्धतीने वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.या मोहिमेत नारायण मालपोटे,नितीन पिंगळे,प्रकाश वरघडे,अजित गोपाळे,पांडुरंग जाचक,बनी शिंदे,राजश्री चौधरी, समीर भिसे,विवेक सूर्यवंशी, शुभम अहिरे,अक्षय ठाकरे, रोहित पगारे, तेजस जाधव यांनी सहभाग घेऊन मोहीम यशस्वीपणे पार पाडली.

# जीआर रद्द केला, आता कंत्राटी कामगार पद्धतही रद्द करा

## राष्ट्रीय श्रमिक आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष यशवंत भोसले यांची मागणी

**पिंपरी-चिंचवड।**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**
शासकीय सेवांचे कंत्राटीकरण मोठ्या प्रमाणात झाले असून त्यामुळे तरुणांच्या रोजगारावर आणि भविष्यावर दूरगामी परिणाम झाले आहेत. कंत्राटी पद्तीने शिक्षकांची भरती करण्याचा जीआर रद्द करणार असल्याची माहिती काल उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केल्याने शिक्षक होण्याचे स्वप्न बाळगणाऱ्या युवक युवतींमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. कंत्राटी शिक्षक भरतीचा जीआर रद्द केला, आता कंत्राटी कामगार पद्तही रद्द करा, अशी मागणी राष्ट्रीय श्रमिक आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष यशवंत भोसले यांनी केली आहे. मोरवाडी, पिंपरी येथे आयोजित पत्रकार परिषदेत पत्रकारांशी त्यांनी संवाद साधला, यावेळी राष्ट्रीय श्रमिक आघाडीचे पदाधिकारी,



पत्रकार आणि मोठ्या संख्यने कामगार उपस्थित होते. यशवंत भोसले म्हणाले, कंत्राटी कामगार कुठे असावेत त्याचे काही नियम आहेत. तात्पुरत्या कामासाठी कंत्राटी कामगार असावा, यासाठी कायदा आला. त्यानंतर उत्पादन प्रक्रियेत कंत्राटी कामगार लावण्याचे फ्याड आलं. गेली १५-२० वर्षात त्याचे पेव फुटले आहे. त्यामुळे अनेक सुशिक्षित तरुणांचे भविष्य अंधारात गेले. या कंत्राटीकरण कायद्याचा दुरुपयोग सुरू झाला. शासकीय आणि खाजगी कार्यालयातील कंत्राटी कामगारांचे ठेके बऱ्यापैकी गुंडांनाच दिले जातात. कंत्राटी कामगारांना किमान २२ हजार पगार मिळाला पाहिजे, पण त्यांच्याकडून आठ हजारावर काम करवून घेतले जाते. यामुळे त्यांची आर्थिक पिळवणूक होते. देशात व राज्यात ९० टक्के सरकारी व खाजगी नोकऱ्याचे कंत्राटीकरण झाले आहे, असेही भोसले म्हणाले. यावेळी कंत्राटी शिक्षक भरतीचा भयंकर जीआर मागे घेतल्याने उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभार व्यक्त करण्यात आले. कंत्राटीकारणाचा मागच्या सरकारने जीआर केला होता. तो जीआर या सरकारने रद्द केला, भाजप राजवट १०० टक्के कंत्राटी पद्धत बंद करील, असा विश्वास वाटतो.

# हल्ली पाच पाच पुणे झाले आहेत!

## पुणे बरबाद व्हायला वेळ लागणार नाही : राज ठाकरे



पुणे।
न्यूज एक्स्प्रेस मराठी।
परखड शब्दांत भाष्य करताना राज ठाकरेंनी सत्ताधाऱ्यांवर टीकास्त्र सोडलं. सत्ताधाऱ्यांची दृष्टी असेल, तर शहराच्या नियोजनात ती प्रतिबिंबित होते, असं सांगतानाच राज ठाकरेंनी मुंबई व पुणे या दोन महत्त्वाच्या शहरांमध्ये निर्माण झालेल्या परिस्थितीविषयी भाष्य केलं. मुंबईतील रस्ते बांधून बाहरच्यांसाठी सोय करताना तिथल्या नागरिकांची गैरसोय होत आहे, असं म्हणतानाच राज ठाकरेंनी पुणे शहर बरबाद व्हायला वेळ लागणार नाही, अशी स्पष्ट भूमिका यावेळी मांडली. पुण्यात एका कार्यक्रमात त्यांची जाहीर मुलाखत घेण्यात आली. यावेळी ते बोलत होते. प्रत्येकानं आपापला परिसर स्वच्छ ठेवला तरी अनेक गोष्टींमध्ये समाधान मिळेल. माझा विचार फक्त एवढाच होता की मला घरातून बाहेर पडल्यावर मी एका चांगल्या शहरात जगतोय असा मला फील आला पाहिजे. तर त्या जगण्याला अर्थ आहे. धक्के खातोय, फुटपाथवर पाय मुरगळतायत, खड्ड्यातून गाड्या जातायत याला जगणं म्हणत नाही. तुमचा जन्म झालाय म्हणून तुम्ही जगताय. इथल्या अनेक तरुण-तरुणींना परदेशात सभोवतालच्या याच वातावरणासाठी परदेशात जायचंय, असा मुद्दा त्यांनी उपस्थित केला.

कालच बातमी आली की मुंबई-पुण्यात प्रदूषणाचं प्रमाण वाढलंय. का? बेसुमार बांधकाम. मुंबईत कोस्टल रोड, उड्डाणपूल, रस्ते, इमारती बांधल्या जात आहेत. हे रस्ते कुणासाठी बांधले जात आहेत? ही मुंबई शहर वा उपनगरात राहणाऱ्या लोकांनी ही लोकसंख्या वाढवलेली नाही. बाहेरून येणाऱ्या लोकांच्या सोयीसाठी तुम्ही तिथे राहणाऱ्या लोकांच्या सर्व सोयी घालवून बसताय, असंही राज ठाकरेंनी यावेळी नमूद केलं. मी गेल्या २५ वर्षांपासून पुण्यात येतोय. मी हजार वेळा सांगितलंय. मुंबई बरबाद व्हायला काळ गेला, पुणं बरबाद व्हायला वेळ लागणार नाही. आज पुणे कुठे राहिलंय? इथे पाच पाच पुणे आहेत. हिंजवडीकडचं पुणे वेगळं, इकडचं पुणं वेगळं, नदीकाठचं पुणं वेगळं, विमाननगरचं पुणं वेगळं.. कुणाचा कशाला काही संबंधच उरलेला नाहीये. पुणं म्हणून कुठे काही राहिलंय? याचं कारण राज्यकर्त्यांचं लक्ष नाहीये, अशा शब्दांत राज ठाकरेंनी पुण्यातील परिस्थितीवर भाष्य केलं. दळणवळण आल्यानंतर सर्व गोष्टी बदलायला लागतात आजूबाजूच्या. हे राज्यकर्त्यांना कळलं पाहिजे की याचं टाऊन प्लॅनिंग आत्ताच करायला पाहिजे. पण ते होत नाही. कारण ती व्यवस्थाच नाही. ज्यांना यातली काही माहिती नाही, त्यांच्याकडून तुम्ही काय अपेक्षा करणार? मग तुम्हाला महापालिका वा राज्य सरकारकडून हेच निकाल मिळणार. परवा कोकणातला ब्रिज कोसळला, कुणाला काही सोयरसुतक नाही. १५ मिनिटांची बातमी आली, विषय संपला, अशा शब्दांत राज ठाकरेंनी आपली नाराजी व्यक्त केली.

### आज पुणे कुठे राहिलंय?

» प्रत्येकानं आपापला परिसर स्वच्छ ठेवला तरी अनेक गोष्टींमध्ये समाधान मिळेल. माझा विचार फक्त एवढाच होता की मला घरातून बाहेर पडल्यावर मी एका चांगल्या शहरात जगतोय असा मला फील आला पाहिजे. तर त्या जगण्याला अर्थ आहे. २५ वर्षांपासून पुण्यात येतोय. मी हजार वेळा सांगितलंय. मुंबई बरबाद व्हायला काळ गेला, पुणं बरबाद व्हायला वेळ लागणार नाही. आज पुणे कुठे राहिलंय? इथे पाच पाच पुणे आहेत. हिंजवडीकडचं पुणे वेगळं, इकडचं पुणं वेगळं, नदीकाठचं पुणं वेगळं, विमाननगरचं पुणं वेगळं.. कुणाचा कशाला काही संबंधच उरलेला नाहीये. पुणं म्हणून कुठे काही राहिलंय? याचं कारण राज्यकर्त्यांचं लक्ष नाहीये, अशा शब्दांत राज ठाकरेंनी पुण्यातील परिस्थितीवर भाष्य केलं.

# पूर्वप्राथमिक शिक्षणासाठीचा अभ्यासक्रम आराखडा!

## स्मारकाचे काम तातडीने सुरु करा: मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

पुणे।
न्यूज एक्स्प्रेस मराठी।
राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाअंतर्गत पूर्वप्राथमिक शिक्षणासाठी राज्य अभ्यासक्रम आराखड्याचा (पायाभूत स्तर) मसुदा राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेने प्रसिद्ध केला. राज्य, राष्ट्र आणि जागतिक पातळीवरील प्रारंभिक संशोधन, शिक्षण क्षेत्राचा विस्तार, पायाभूत स्तरावरील बालकांचे शिक्षण, राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातील पूर्वप्राथमिक स्तरासाठीची उद्दिष्ट्ये, क्षमता आणि अध्ययन निष्पत्ती अशा मुद्द्यांवर भर देण्यात आला आहे. भाषा शिक्षण आणि साक्षरतेबाबत दृष्टिकोन, अध्यापनशास्त्र, अध्ययन, वेळेचे व्यवस्थापनाबाबत मार्गदर्शन करण्यात आले आहे एनसीईआरटीने शालेय शिक्षणाचा राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा प्रसिद्ध केल्यानंतर राज्याच्या अभ्यासक्रम आराखड्याकडे लक्ष लागले होते. शिक्षणाच्या प्रक्रियेत पूर्वप्राथमिक शिक्षण महत्वाचे आहे. त्यामुळे या मसुद्यात ० ते ८ वर्षांच्या



बालकांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने मार्गदर्शक तत्त्वे सांगण्यात आली आहे. प्राथमिक शाळेत नावनोंदणी वाढली असली, तरी बालसंगोपन, बालशिक्षण कार्यक्रमातील नावनोंदणी अजूनही कमी आहे. अंगणवाड्यांची व्यापकता असूनही पूर्व प्राथमिक शिक्षणातील नोंदणी कमी आहे. २०२१-२२मध्ये राज्यातील शासकीय आणि खासगी अनुदानित शाळेतील प्रवेशित १२ लाख ३३ हजार ४८० विद्यार्थ्यांपैकी केवळ ६८.४४ टक्के विद्यार्थ्यांना पूर्वप्राथमिक शिक्षणाचा अनुभव होता. २०१९-२०मध्ये शहरी भागातील ५५.९ टक्के मुले, तर ग्रामीण भागात ६४.३ टक्के मुले, म्हणजे सरासरी ६०.३ टक्के मुले पूर्वप्राथमिक शाळेत जात असल्याची माहिती मसुद्यात देण्यात आली आहे. मसुद्याचा दस्तावेज ३४० पानांचा आहे. त्यात अभ्यासक्रमाची ध्येये, भाषा आणि साक्षरतेबाबत दृष्टिकोन, अध्यापनशास्त्राची तत्वे, खेळातून शिक्षण, साक्षरता आणि संख्याज्ञान, अध्ययन अध्यापन साहित्य, अध्ययन वातावरण, मूल्यांकन अशा घटकांचा मसुद्यात समावेश आहे. प्राथमिक स्तरावर जोडणारे दुवे, सहायक शैक्षणिक परिसंस्था निर्मिती, अतिरिक्त निर्णायक क्षेत्रे अशा विषयांबाबत सविस्तर माहिती प्रसिद्ध करण्यात आली आहे. या मसुद्यात राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची तत्त्वे नमूद करण्यात आली असून, अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने मार्गदर्शक सूचना देण्यात आल्या आहेत.

# सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रात जैन समाजाचे मोलाचे योगदान!

## शंकरलाल जोगीदास मुथा यांच्या पुतळ्याच्या अनावरणप्रसंगी खासदार शरद पवार यांचे प्रतिपादन

**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** शैक्षणिक क्षेत्रात शंकरलाल मुथा यांनी मोठे काम केले त्यांचा पुतळा आज उभारला आहे. श्री जैन विद्या प्रसारक मंडळ या संस्थेला ९७ वर्ष पूर्ण झाले आहेत. शैक्षणिक क्षेत्रात मोलाचे काम या संस्थेने केले. शैक्षणिक क्षेत्रात गुंतवणूक करायची म्हणून नव्हे तर सामाजिक कार्य म्हणून या संस्थेची स्थापना झाली. शिक्षण क्षेत्रात जैन समाजाचे मोलाचे योगदान आहे असे प्रतिपादन खासदार शरद पवार यांनी केले. शिक्षणमहर्षी दिवंगत शंकरलाल जोगीदास मुथा यांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी उभारण्यात आलेल्या पुतळ्याचे अनावरण खासदार शरद पवार यांच्या हस्ते चिंचवड येथील रसिकलाल एम. धारिवाल इंटरनॅशनल स्कूलच्या प्रांगणात शनिवारी (दि. २१) झाले. यावेळी साताऱ्याचे खासदार श्रीनिवास पाटील, मावळचे खासदार श्रीरंग बारणे, जैन विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष प्रकाशचंद धारिवाल व पदाधिकारी उपस्थित होते.



पवार म्हणाले, संस्था चालवत असताना अनेक संकटे येतात. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी शिक्षणसंस्था उभारत महाराष्ट्रात शिक्षणाची मूहर्तमेढ रोवली. एकेकाळी त्यांच्या वसतिगृहामध्ये विद्यार्थ्यांना जेवणाची पंचाईत झाली होती. ही बातमी भाऊरावांच्या पत्नीच्या कानावर गेली. त्यांनी त्यांच्या गळ्यातले मंगळसूत्र काढून ते विका पण माझी पोर उपाशी राहता कामा नये असे सांगितले. एवढी त्यागाची भावना असल्याने आज त्या संस्थेतून अनेक विद्यार्थी घडले. अशाच अडचणी शंकरलाल मुथा यांनाही आल्या, मात्र त्यांनी न डगमगता आपली संस्था वाढवली. आज या संस्थेत १५ हजार मुले शिक्षण घेत आहेत ही आनंदाची बाब आहे. येथील मुलांमध्ये शिक्षणासोबतच आत्मविश्वास निर्माण करण्याचे काम या शैक्षणिक संस्थांनी केले असल्याचे शरद पवार यांनी सांगितले.

### मदतीसाठी पिंपरी चिंचवड तत्पर

» किल्लारीला भूंकप झाला होता त्यावेळी अनेक मुले निराधार झाली होती. मी त्या मुलांना घेऊन पिंपरी चिंचवडला आणले. त्यांच्यासाठी भारतीय जैन संघामध्ये राहण्याची व्यवस्था केली. आज ती मुले डॉक्टर, इंजिनियर, सरकारी अधिकारी झाली आहेत. त्यावेळी एका शब्दावर पिंपरी चिंचवड मदतीला धावले. मुख्यमंत्री असताना नैसर्गिक आपत्ती, बॉम्बस्फोट या आपत्ती हाताळल्या. त्यानंतर चार - पाच वर्ष प्रशासनामध्ये लक्ष घालून यंत्रणा सज्ज केल्या. त्यामुळे आज कोणतीही आपत्ती आली तर राज्यातील यंत्रणा सज्ज असल्याचे पवार म्हणाले.

# जेजुरी खंडोबा मंदिर भाविकांच्या दर्शनासाठी खुले!

## मुख्य मंदिर दुरुस्तीच्या कामासाठी दीड महिन्यापासून ठेवण्यात आले होते बंद

**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** साऱ्या महाराष्ट्राचे कुलदैवत असलेल्या जेजुरीच्या खंडोबा गडातील मुख्य मंदिर दुरुस्तीच्या कामासाठी दीड महिन्यापासून बंद ठेवण्यात आले होते. मंदिर दुरुस्तीचे बहुतांशी काम पूर्ण झाल्याने शनिवारपासून (२१ ऑक्टोबर) मंदिर दर्शनासाठी खुले करण्यात आल्याची माहिती श्री. मार्तंड देवस्थानचे मुख्य विश्वस्त पोपटराव खोमणे यांनी पत्रकार परिषदेत दिली.यावेळी विश्वस्त मंगेश घोणे,ॲड विश्वास पानसे, ॲड पांडुरंग थोरवे, अनिल सौंदाडे, राजेंद्र खेडेकर,व्यवस्थापक राजेंद्र जगताप उपस्थित होते. खंडोबा मंदिराचा मुख्य गाभारा बंद असल्याने जेजुरीत येणाऱ्या भाविकांची संख्या घटली होती. त्यामुळे जेजुरीच्या अर्थव्यवस्थेवर मोठा परिणाम झाला. आता खंडोबा मंदिर भाविकांसाठी खुले झाल्याने दसऱ्यानंतर



भाविकांच्या गर्दीत मोठी वाढ होण्याची शक्यता आहे. महाराष्ट्र शासनाच्या पुरातत्त्व खात्यातर्फे खंडोबा गडावर मंदिर दुरुस्तीचे व सुशोभीकरणाचे काम सुरू आहे. यामुळे मंदिर बंद ठेवावे लागले होते. खंडोबा देवस्थानतर्फे दसरा सोहळ्याची जय्यत तयारी सुरू असून गडाला आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. कडेपठारच्या डोंगरातील रमणा या ठिकाणी रस्त्याची स्वच्छता व सर्वत्र पथ दिव्यांची व्यवस्था करण्यात आली आहे. रमणामध्ये मध्यरात्री कडेपठारची पालखी व खंडोबा गडातील पालखी यांच्या भेटीचा पारंपरिक सोहळा असतो. याला हजारो भाविकांची उपस्थिती असते. दसऱ्याच्या दुसऱ्या दिवशी खंडोबा गडामध्ये एक मण वजनाचा खंडा (तलवार) उचलणे आणि कसरतीचे कार्यक्रम असतात. यावेळी प्रत्येकी सात बक्षिसे देण्यात येणार असून प्रथम क्रमांकासाठी ३१ हजार रुपये रोख पारितोषिक दिले जाणार आहे. या स्पर्धे साठी प्रमुख पाहुणे म्हणून पुण्याचे जिल्हाधिकारी राजेश देशमुख,पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षक अंकित गोयल, अप्पर जिल्हा पोलीस अधीक्षक आनंद भोईटे आदी उपस्थित राहणार आहेत, अशी माहिती विश्वस्त मंडळाने दिली.